ePaper


अजितदादा की चंद्रराव तावरे? माळेगाव कारखान्याच्या निवडणुकीत कोण जिंकणार?

| वर्ष - 8 | अंक - 314 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

| www.mahaenews.com | सोमवार, दि. 23 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- क्रिकेटप्रेमींसाठी धक्कादायक गोष्ट!
- यशस्वीच्या हातून सोपे झेल निसटले
- इंधन पुरवठ्यावर परिणामांची भीती
- एअर इंडियाचा घेतला मोठा निर्णय


## इस्त्रायल-इराण युद्ध पेटले, तिसऱ्या महायुद्धाची ठिणगी ? मुस्लिम राष्ट्रे एकवटणार!

# युद्धात अमेरिकेची एन्ट्री!

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशानंतर इराणच्या 3 अणुप्रकल्पांवर बॉम्ब हल्ला : इराणही आक्रमक!

। नवी दिल्ली / न्यूयॉर्क / तेहरान : रॉयटर । वृत्तसंस्था । महाईन्यूज

**संपूर्ण जग आता तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर आहे की काय, अशी स्फोटक परिस्थिती निर्माण झाली आहे. इस्रायल आणि इराणच्या युद्धात अमेरिकेने थेट उडी घेतल्याने आणि इराणने अधिक आक्रमकता दाखवल्यामुळे तिसऱ्या महायुद्धाची ठिणगी पडली असल्याचे अनेक संरक्षण तज्ज्ञांना वाटत आहे. या पार्श्वभूमीवर इराणने सर्व मुस्लिम राष्ट्रांना एकत्र येण्याचे आवाहन केले असून डोनाल्ड ट्रम्प यांना किंमत चुकवावी लागेल असा इशारा वजा धमकी दिली आहे**



### इराणवर हल्ल्याचा ट्रम्प यांचा आदेश

गेले आठवडाभर सुरू असलेल्या इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धात आता अमेरिकेची एन्ट्री झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या अणुकेंद्रांवर हल्ला करण्याचे आदेश दिले आणि हे हल्ले यशस्वी झाल्याचे संपूर्ण जगाला ट्विट करून सांगितले. अमेरिकन सैन्याने इराणमधील तीन प्रमुख अणुप्रकल्पांवर यशस्वी बॉम्ब हल्ले केले असल्याचे ट्रम्प यांनी संपूर्ण जगाला सांगितले आहे.

### इराणचे तीन प्रकल्प उद्ध्वस्त !

अमेरिकेने केलेल्या या हल्ल्यांमुळे इराणचे 'फोर्डो', 'नतान्झ' आणि 'इस्फाहान' हे महत्त्वाचे अणुसमृद्धीकरण प्रकल्प पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहेत, असे लष्कराच्या प्रवक्त्याने सांगितले. या कारवाईमुळे अमेरिका आता इस्त्रायल, इराण यांच्यातील युद्धात थेट सहभागी झाली आहे, ज्यामुळे मध्य पूर्वेतील तणाव आणखी वाढला आहे. आणखी काही देश या युद्धात उडी टाकण्याच्या विचारात आहेत, त्यामुळे तिसरे महायुद्ध उंबरठ्यावर येऊन ठेपले आहे.

### इराणचीही अमेरिकेला धमकी !

अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणच्या लष्कराने अमेरिकेला सुनावले आहे, की या हल्ल्यांची किंमत अमेरिकेला पूर्णपणे चुकवावी लागेल. डोनाल्ड ट्रम्प यांना आम्ही घाबरत नाही आणि त्यांना सडेतोड उत्तर दिले जाईल, हे त्यांनी लक्षात घ्यावे. अमेरिकेची युद्धाची खुमखुमी एक दिवस जिरवल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही आणि शरण तर मुळीच येणार नाही असे इराणने म्हटले आहे. तुम्ही युद्ध सुरू केले आम्ही त्याचा शेवट करणार असा इशाराही इराणने दिला आहे..

### अमेरिकेकडे खतरनाक विमाने

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, या हल्ल्यांमध्ये अमेरिकेने बी-२ बॉम्बर्सचा वापर केला. हे बॉम्बर्स ३० हजार पाऊंड वजनाचे 'जीबीयु -५७ मॅसिव्ह ऑर्डनन्स पेनिट्रेटर' वाहून नेण्यास सक्षम आहेत, जे जमिनीखालील खोल लक्ष्यांना नष्ट करण्यासाठी खास बनविले आहेत. शत्रूच्या लक्षात येईपर्यंत त्यांचे टार्गेट उद्ध्वस्त झालेले असते.

### इराणचा सर्वोच्च नेता बंकरमध्ये..

इस्रायलबरोबर संघर्ष सुरू झाल्यानंतर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांनी एका खोल बंकरमध्ये सुरक्षित आश्रय घेतला आहे. रिपोर्टनुसार, खामेनेई यांनी आपल्या मृत्यूनंतर वारसदार म्हणून तीन वरिष्ठ धर्मगुरुंची नावे निश्चित केली आहेत. त्यांनी सर्व इलेक्ट्रॉनिक दळणवळण बंद करण्याचे आदेश दिले आहेत, ज्यामुळे त्यांचा ठावठिकाणा शोधणे कठीण झाले आहे. या तिघांमध्ये त्यांच्या मुलाच्या नावाचा समावेश नाही, असेही सांगण्यात येते.

### डोनाल्ड ट्रम्प यांचे वक्तव्य

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ओव्हल ऑफिसमधून प्रसारित केलेल्या भाषणात स्पष्ट सांगितले की, 'इराणचे अणुनिर्मिती प्रकल्प पूर्णपणे नष्ट झाले आहेत. हा हल्ला आमच्या लष्करी सामर्थ्याचा आणि कौशल्याचा एक उत्कृष्ट नमुना आहे. आमच्या सैनिकांनी अचूकता आणि कौशल्याने ही मोहीम पूर्ण केली आहे.' त्यांनी इराणला शांततेचा मार्ग स्वीकारण्याचा इशारा देताना म्हटले आहे की , जर इराणने शांतता निवडली नाही, आम्ही इतर लक्ष्यांवरही ताकदीने हल्ले करू.

### बॉम्ब टाकून विमाने सुखरूप परत!

डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या 'ट्रूथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरही या हल्ल्याची माहिती दिलीआहे. "फोर्डोवर बॉम्ब टाकण्यात आले. त्यानंतर सर्व विमाने सुखरूप परतली आहेत. अमेरिकेच्या सैनिकांचा मला अभिमान वाटतो आणि त्यांचे विशेष अभिनंदन! आता शांततेची वेळ आहे, असेही त्यांनी लिहिले आहे.

### 'ऑपरेशन राइजिंग लायन..

इराणच्या विरोधात इस्त्रायलने 'ऑपरेशन रायझिंग लायन' सुरू केले आणि त्याअंतर्गत इराणच्या अणु आणि लष्करी ठिकाणांवर हल्ले सुरू केले होते. इराण अणुबॉम्ब विकसित करत असल्याचा आरोप इस्त्रायलने केला होता. याला प्रत्युत्तर म्हणून इराणने ४५० क्षेपणास्त्रे आणि सुमारे एक हजार ड्रोन डागले आहेत, त्यात मोठी प्राणहानी झाल्याचेही सांगण्यात येते.

### इस्त्रायलकडून अमेरिकेचे कौतुक..

इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयाचे जोरदार स्वागत केले असून त्यांचे अभिनंदनही केले आहे. एका व्हीडिओ भाषणात ते म्हणाले, की ट्रम्प यांनी इराणच्या अणु प्रकल्पांवर हल्ला करून इतिहास घडवला आहे. शक्तीतून शांतता येते आणि अमेरिकेने ती शक्ती दाखवली. नेतन्याहू यांनी हे पाऊल मध्य-पूर्वेतील शांततेसाठी महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

# परीक्षा, मूल्यमापन सेवा कागदविरहित

## विद्यापीठाकडून स्वतंत्र संकेतस्थळाची निर्मिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात परीक्षा आणि मूल्यमापनविषयक सर्व सेवा आता कागदविरहित केल्या जाणार आहेत. कागदविरहित सेवेसाठी स्वतंत्र संकेतस्थळ विकसित करण्यात आले असून, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, परिसंस्थांसाठी संकेतस्थळ २३ जूनपासून कार्यान्वित करण्यात येणार आहे.परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी ही माहिती दिली.**



विद्यापीठातील विभाग आणि संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ट्रान्सस्क्रिप्ट, पदवी प्रमाणपत्र, गुणपत्रक अशी कागदपत्रे महत्त्वाची असतात. आतापर्यंत विद्यार्थ्यांना या प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करून त्या अर्जाची प्रत विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रात जमा करावी लागते. त्यात विद्यार्थ्यांचा वेळ जातो. त्यामुळे ही प्रक्रिया कागदविरहित करण्याचा निर्णय घेण्यात आला. आता परीक्षा विभागाच्या छाननी आणि सारणी कक्षाचे कामकाज कागदविरहित करण्यात आले आहे. त्यासाठी grievance.unipune.ac.in हे स्वतंत्र संकेतस्थळ आणि कक्ष स्थापन करण्यात आला आहे.डॉ. देसाई यांच्या परिपत्रकानुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळाने परीक्षा व मूल्यमापनविषयक विद्यार्थिकेंद्रित सर्व सेवा कागदविरहित करण्याच्या प्रक्रियेतील पुढचा टप्पा सुरू केला आहे. परीक्षा, मूल्यमापन, निकाल, तसेच निकालोत्तर अनेक त्रुटी या सुविधेमुळे अद्ययावत दुरूस्त होऊन पर्यायाने विद्यार्थी, महाविद्यालये आणि परिसंस्थांना परीक्षा व मूल्यमापन संदर्भातील सर्व दुरुस्त्या, निर्णय किंवा इतर गोष्टीही कागदविरहित उपलब्ध होत आहेत. परीक्षा व मूल्यमापन सेवा याच संकेतस्थळाद्वारे आपण परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाकडे प्रस्ताव, अर्ज, विनंती सादर कराव्यात. या संकेतस्थळाद्वारे काही समस्या, त्रुटी या छाननी आणि तालिनीकरण कक्षाच्या स्तरावरच निरसित होतील. प्रमाद समितीपुढे किंवा इतर अधिकार मंडळांकडून सोडवल्या जाणे अपेक्षित असलेले विषय तिकडे वर्ग होतील.

### बरेचसे काम कागदविरहित

विद्यापीठातील विभाग आणि संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ट्रान्सस्क्रिप्ट, पदवी प्रमाणपत्र, गुणपत्रक अशी कागदपत्रे महत्त्वाची असतात. आतापर्यंत विद्यार्थ्यांना या प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करून त्या अर्जाची प्रत विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रात जमा करावी लागसर्व सेवा कागदविरहित करण्याच्या प्रक्रियेतील पुढचा टप्पा सुरू केला आहे. परीक्षा, मूल्यमापन, निकाल, तसेच निकालोत्तर अनेक त्रुटी या सुविधेमुळे अद्ययावत दुरूस्त होऊन पर्यायाने विद्यार्थी, महाविद्यालये आणि परिसंस्थांना परीक्षा व मूल्यमापन संदर्भातील सर्व दुरुस्त्या, निर्णय किंवा इतर गोष्टीही कागदविरहित उपलब्ध होत आहेत.

आता याच संकेतस्थळाद्वारे प्रमादविषयक तक्रारी आणि त्या अंतर्गत सभा आयोजित करण्यात येणार आहेत. त्यामुळे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी यांचा वेळ आणि प्रशासकीय कामकाजापोटी महाविद्यालयांना सोसावा लागणारा खर्चही संपुष्टात येईल. या प्रक्रियेची तत्काळ अंमलबजावणी आपल्या स्तरावर करावी, असे स्पष्ट करण्यात आले. आतापर्यंत विद्यार्थी, शिक्षकांना प्रत्यक्ष विद्यापीठात येऊन कागदपत्रे सादर करावी लागत होती. यापूर्वी परीक्षा विभागातील बरेचसे काम कागदविरहित झाले आहे. आता छाननी कक्षही कागदविरहित झाला आहे. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षकांची कामे ऑनलाइन पद्धतीने मार्गी लागतील. हे विद्यापीठाने टाकलेले पाऊल महत्त्वाचे आहे, असे अधिसभा सदस्य राहुल पाखरे यांनी सांगितले.

# शालेय वाहनांमध्ये सीसीटीव्ही बसवा

## शालेय समितीवर जबाबदारी, तपासणी करून कारवाईचा इशारा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यासाठी ३१ जुलैची मुदत देण्यात आली आहे. पुणे पोलीस आयुक्तांनी विद्यार्थी सुरक्षिततेसंदर्भात नियमावलीची शालेय व्यवस्थापन समितीकडून आणि वाहनचालकांकडून अंमलबजावणी होत आहे किंवा नाही यासाठी पुणे उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून (आरटीओ) तपासणी मोहीम हाती घेण्यात येणार आहे.**



पुणे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) नुकतेच परिपत्रक काढून पोलीस आणि परिवहन विभागाकडून संयुक्त तपासणी मोहीम हाती घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. शालेय शिक्षण विभागाने स्थापन केलेल्या 'शालेय परिवहन समिती' आणि 'विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा समिती'चा आधार घेऊन नियंत्रण ठेवण्यासंदर्भात शाळांना सांगितले आहे.शहरासह, उपनगरांतील शाळा १६ जूनपासून सुरू झाल्या. तत्पूर्वी शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसंदर्भात पुणे पोलिसांनी नियमावली जाहीर केली. शालेय बस, व्हॅन आणि रिक्षांमधून क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची वाहतूक होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होताच पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी परिवहन विभागासोबत बैठक घेतली. यावेळी 'आरटीओ'ला नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश दिले. शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांना दरवर्षी नेत्रतपासणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार या चालकांची नेत्रतपासणी झाली आहे किंवा नाही याचे प्रमाणपत्र सोबत बाळगावे लागणार आहे. याबाबत शालेय व्यवस्थापन समितीने याची तपासणी करून ज्या वाहनचालकांनी नेत्रतपासणी केली नसेल, अशा चालकांना

### पुणे पोलिसांनी नियमावली जाहीर

शहरासह, उपनगरांतील शाळा १६ जूनपासून सुरू झाल्या. तत्पूर्वी शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसंदर्भात पुणे पोलिसांनी नियमावली जाहीर केली. शालेय बस, व्हॅन आणि रिक्षांमधून क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची वाहतूक होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होताच पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी परिवहन विभागासोबत बैठक घेतली.

वाहन चालविण्यास देऊ नये, असेही निर्देश परिवहन विभागाने दिले आहेत. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस आयुक्तांनी काढलेल्या नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन विभाग आणि वाहनचालकांना सूचना देण्यात आल्या आहेत. वाहनांमध्ये ३१ जुलैपर्यंत सीसीटीव्ही बसविण्याची मुदत देण्यात आली असून, याबरोबर सर्व नियमांची काटेकोर अंमलबजावणी होत आहे किंवा नाही, याबाबत पुणे पोलीस आणि आरटीओ अशी संयुक्त तपासणी मोहीम राबविली जाणार आहे. तपासणीत दोषी आढळणाऱ्या वाहनांवर कडक कारवाई केली जाईल.परिवहन विभागाकडून संयुक्त तपासणी मोहीम हाती घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. शालेय शिक्षण विभागाने स्थापन केलेल्या 'शालेय परिवहन समिती' आणि 'विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा समिती'चा आधार घेऊन नियंत्रण ठेवण्यासंदर्भात शाळांना सांगितले आहे.

## आरटीओचे दुर्लक्ष, खासगी बसचे भाडे दामदुपट्ट

# पिंपरी चिंचवडमधील प्रवाशांची 'सरकारमान्य' लूट

## बसच्या मनमानी भाड्यामुळे प्रवाशांच्या खिशाला चाट

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सुट्ट्यांचा हंगाम सुरु झाला की, नागरिकांना मूळ गावी जाण्याचे किंवा नातेवाईकांना भेटण्यासाठी अथवा पर्यटनाला जाण्याचे वेध लागतात. ह्या काळात रेल्वेला असलेली गर्दी, प्रतीक्षा यादी बघता सामान्य नागरिक हा खासगी प्रवासी बसद्वारे प्रवासाला प्राधान्य देतो. मात्र ,नेमकी प्रवाश्यांची ही गरज ओळखून खासगी बस मालकांनी प्रचंड भाडेवाढ केली आहे. यातून ग्राहकांची पिळवणूक आणि लूटमार सुरू आहे.**



दरम्यान, जास्त भाडे आकारणी करणाऱ्या बसचालक, मालक आणि कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्यात आरटीओ आखडता हात घेत असल्याने प्रवाशांची चक्क 'सरकारमान्य' लूट सुरू आहे.पिंपरी-चिंचवड ही कामगार, कष्टकऱ्यांची नगरी म्हणून ओळखली जाते. राज्याच्या तसेच परराज्यातील कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने चाकरमानी उद्योगनगरीत वास्तव्यास आहेत. दिवाळी तसेच उन्हाळ्यात मुलांना शाळेला सुटी लागत असल्याने अनेक जण कुटूंबासह गावी जाण्यास प्राधान्य देतात. शहरातून मूळगावी जाणाऱ्या प्रवाशांमध्ये विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रवाशांची संख्या अधिक आहे. मुख्यत्वे दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीच्या काळात ही संख्या खूप मोठी असते. उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर रेल्वेचे बुकिंग फुल्ल झालेले आहे. एसटी महामंडळाकडेही प्रवाशांची गर्दी असते. त्यामुळे प्रवाशांना खासगी ट्रॅव्हल्स हाच पर्याय शिल्लक असतो.

मात्र, याच संधीचा खासगी प्रवासी वाहतुक करणारे गैरफायदा उठवतात. शहरातून दररोज सुमारे पाचशेहून अधिक खासगी बस राज्याच्या विविध भागात जातात. या व्यतिरिक्त मुंबईहूनही मोठ्या संख्येने खासगी बस पुण्यातून पुढे मार्गस्थ होतात. ट्रॅव्हल्स चालकांकडून या काळात मोठ्या प्रमाणात तिकीट दर वाढवले जातात. काही ठिकाणी तिकीट दरामध्ये दुप्पट, तिप्पट वाढ केली जाते. ही वाढ प्रवाशांच्या खिशाला चांगलाच चाट लावत आहे. प्रवाशांची संख्या वाढण्याच्या काळात बसचे भाडे वाढविण्याचे प्रकार होतात. त्यामुळे प्रवाशांना मोठा भुर्दंड बसत आहे. त्यामुळे सुटीच्या काळात गावी जावे की नाही असा प्रश्न सर्वसामान्यांना भेडसावत आहे. उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत खासगी प्रवासी बसची वाहतूक पथकामार्फत तपासणी करावी. तिकिट बुकिंग काउंटरवरदेखील जाऊन तपासणी व्हावी. गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जावी. भाडेवाढीमुळे प्रवाशांना विनाकारण भुर्दंड सहन करावा लागत आहे. या त्रासापासून सुटका होऊन नागरिकांची होणारी लूटमार थांबवावी, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

### सरकारच्या कमाल दराकडे दुर्लक्ष

खासगी प्रवासी बसला एसटी बसच्या प्रतिकिलोमीटर भाडेदाच्या दीडपट भाडे आकारता येते. याबाबतचे कमाल भाडे सरकारने निश्चित केले आहे. हे दीडपट दर केवळ उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत असतात. काही खासगी प्रवासी बस सणासुदीच्या व गर्दीच्या हंगामामध्ये प्रवाशांकडून मनमानी भाडे आकारतात. मात्र, जास्त भाडे आकारणाऱ्या खासगी बसवर आरटीओ आणि वाहतूक पोलिसांकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे खासगी आराम बस चालकांच्या मनमानीत वाढ होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बसमालकांवर आरटीओने कारवाई करणे गरजेचे आहे.

## बचत गटांच्या महिलांकडून मालमत्ता कर बिलांचे वाटप!

## मालमत्ताधारकांनी सहकार्य करावे : पिंपरी-चिंचवड पालिका प्रशासनाचे आवाहन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षातही महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. तरी बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.**





पिंपरी-चिंचवड शहरात ६ लाख १५ हजार ८६३ नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार सर्वच बिलांची छपाई होऊन बिले वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. महिला बचत गटातील महिलांच्या माध्यमातून मिळकतकर बिले घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी महानगरपालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपवली आहे. बिल वाटप करण्यात येणाऱ्या महिलांना महानगरपालिकेच्या वतीने ओळखपत्र ही देण्यात आले आहे. ३१ मे पर्यंत सर्व बिलांचे वितरण करण्याचे नियोजन महानगरपालिकेने केले आहे. तरी नागरिकांनीही बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. मालमत्ता कर भरण्याची ऑनलाइन सुविधा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ ची मालमत्ता कर बिले ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली असून, करदात्यांना त्यांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांची बिले www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता व भरता येतील. तसेच मालमत्ता कर बिले ३० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने बिले भरल्यास सामान्य करावर १० टक्के सवलत मिळणार आहे.

> बचत गटांच्या महिलांमार्फत मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू झाले आहे. यामुळे बचत गटांच्या महिलांच्या आर्थिक सक्षमतेस बळकटी मिळणार आहे. तसेच नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. नागरिकांनी देखील बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> पिंपरी चिंचवड महानगरपालिका मालमत्ता कर विभागाचे बिल वाटप महिला बचत गटांच्या महिलांमार्फत करण्यात येत आहे. ३० जून २०२५ पर्यंत कर भरल्यास मालमत्ताधारकांना विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा.
>
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### सुख त्यागात आहे, भोगात नाही.

अमुक हवे असे वाटले आणि ते मिळाले नाही, म्हणजे दुःख होते. अमुक हवे असे वाटूच देऊ नये. परमात्मा ठेवील त्यात समाधान मानावे. याचेच नाव वैराग्य. आपण विषयांत बुडतो आहोत, आणि पुन: विषयाचीच कास धरली तर आपण अधिकाधिक नाही का बुडणार ? विषयाची आस धरणे म्हणजे त्याचे दास होण्यासारखेच आहे. मनुष्य सुखाकरिता धडपड करतो, आणि अंती दुःखमय अशा विषयाची आशा करतो. सुख त्यागात आहे, भोगात नाही, हे पुष्कळांना पटत नाही. परिसाला लोखंड लागले म्हणजे त्याचे सोने होते, पण रुप्याचे काही सोने होत नाही; तसे आपण दीनाहून दीन, म्हणजे अभिमानरहित झाले पाहिजे, आणि असे झाले म्हणजेच परमात्म्याला अनन्य शरण जाता येईल. हे व्हायला त्याची कृपाच पाहिजे, आणि ती नित्य भाकावी. एखाद्या गोष्टीने आपले मन अस्वस्थ होते ते का बरे ? त्या गोष्टीला आपण सत्यत्व देतो म्हणून. हा सर्व खेळ आहे, हे मिथ्या आहे, असे जाणून, ज्याप्रमाणे नट नाटकातली आपली भूमिका अगदी खऱ्यासारखी करतो, त्याप्रमाणे व्यवहार करावा. सुख, समाधान, सत्यात असते, मिथ्यात नसते. आजपर्यंत आपण विषय उपभोगले पण त्यांत आपल्याला सुख झाले नाही; मग विषय मिथ्या आहेत याची भगवंताने तुम्हांला प्रचीती नाही का दिली ? तरीसुद्धा तुम्ही या विषयांतच प्रपंच कसा सुधारेल असे मला विचारता, याला काय म्हणावे ? जे दुःखमयच आहे त्यात सुख कुठून मिळणार ? दोन लहान मुली भातुकली खेळल्या; जी मुलगी गरीब होती तिने पोळ्या आणि गुळांबा केला, पण जी श्रीमंत होती तिने मात्र श्रीखंड आणि बासुंदी केली. पहिलीचा गुळांबा जितका पोट भरण्याला उपयोगी नाही, तितकेच दुसरीचे श्रीखंडही उपयोगी नाही. तसे प्रपंचाचे खरेपण आहे. प्रपंच असण्यासाठी बायको आणि मुले यांची गरज आहेच असे नाही; जो दुसऱ्यावर अवलंबून असतो तो प्रपंचीच असतो. म्हणून मनुष्य एकटा असला तरी प्रपंचीच असतो. दुसऱ्यापासून सुख मिळविण्याचा प्रयत्न करणारा मनुष्य हा प्रपंची होय. पाचजण मिळून प्रपंच बनतो. त्यामध्ये प्रत्येकजण स्वार्थी असतो. मग सर्व सुख एकट्यालाच मिळणे कसे शक्य आहे ? प्रपंचामध्ये अनेक वस्तू आहेत, पण भगवंताजवळ एकच वस्तू आहे. प्रपंचामध्ये कितीही वस्तू आणल्या तरी पुऱ्या पडत नाहीत, कारण एका वस्तूच्या आणण्यामध्येच दुसऱ्या वस्तूच्या आणण्याचे बीज आहे. पण भगवंताचे तसे नाही. भगवंताची वस्तू एकदा आणली की पुन: ती आणायला नको.

बोधवचन:- 'अमुक एक वस्तू आहे म्हणून मी सुखी आहे' या वृत्तीत राम नसून, काही नसताना वृत्तीचे समाधान टिकले पाहिजे.

# 'भाजपा' रुपी पवित्र गंगा, होत चालली गटारगंगा !



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

**भारतीय जनता पार्टी म्हणजे सध्या 'आओ, जाओ घर तुम्हारा' असे काहीसे समीकरण झाले आहे. आओ म्हणजे पक्षात कोणीही येत आहे.. पण जाओ म्हणजे कोणीही जात नाही ! मग, त्यात कोणत्याही पक्षातील गुंड, गुन्हेगार, भ्रष्टाचारी, बलात्कारी, दरोडेखोर यांचे जोरदार 'इनकमिंग' सुरू आहे. भाजपाचे नेमके धोरण काय, हे मात्र समजत नाही. पक्षाची ताकद वाढत आहे, या एका ध्येयापोटी कोणालाही प्रवेश देत सुटले आहेत !**



### भाजपाच्या प्रतिमेचे काय ?

हे सर्व धडधडीत घडत असताना भारतीय जनता पार्टीच्या प्रतिमेचे काय? हा खरा प्रश्न उरतोच. भारतीय जनता पार्टी म्हणजे पवित्र गंगा झाली आहे, कोणी पण या डुबकी मारून पवित्र व्हा, हा संदेश आता भाजपवाले जगात देत असावेत ! आपल्या संस्कृतीत गंगा नदीला पवित्र मानले जाते. या नदीचे महत्त्व इतके आहे की आयुष्यभर पापे करूनही जर नदीत एकदा जरी स्नान केले, तरी संबंधितांची म्हणे सगळी पापे धुऊन जातात. अशी समाजात पसरलेली श्रद्धा आहे आणि श्रद्धा म्हणजे शंभर टक्के प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकत नाही.

### श्रद्धेचा अर्थ विश्लेषण नाही..

आपल्या समाजामध्ये श्रद्धा म्हटले म्हणजे त्याला पर्याय नसतो आणि टीका करायची नसते.. तार्किक विश्लेषण करायला काहीच अर्थ नसतो. पापे धुण्याची जी भूमिका पवित्र गंगा नदीने स्वीकारली आहे, तीच राजकारणात भाजपा ने घेतल्याचे दिसते. विरोधक अशा फुटणाऱ्यांना थेट देशद्रोही आणि समाजकंटक संबोधतात, अशावेळी त्यांच्या सुरात सूर भाजपा नेत्यांकडूनही मिसळले जातात. परंतु, एकदा का त्याने भाजपा मध्ये गंगा स्नान केले की त्याची सगळी पापे क्षणात धुतली जातात आणि तो थेट पवित्र बनतो, समाजात उजळ माथ्याने फिरतो..

### सत्तापिपासूंचे हमखास सत्तांतर..

सत्तेच्या मार्गावर जाण्यासाठी सरसावलेले सत्तापिपासूंचे थवे सतत घोंगावत असतात आणि अनेक नेत्यांनी आपली पापे धुतल्याचे आणि भाजपा मध्ये प्रवेश केल्यानंतर पवित्र झाल्याचे ढोल वाजवत मिरवले आहे. सत्तेसाठी कोण कोणत्या थराला जाते याचे जिवंत उदाहरण म्हणजे भाजपा आहे.भाजपामध्ये अगदी थोडे नेते आहेत की ज्यांच्यावर एकही आरोप नसेल. येथे अडचणीत आलेल्या, आरोपांनी भरलेल्या किंवा कारागृहात जाऊन आलेल्या सर्वांचा गुलाल उधळला जातो, हे दुर्दैवाने कटू सत्य आहे.

### राजकीय शुद्धीकरणासाठी वाटेल ते..

राजकीय शुद्धीकरणाचे केंद्र बनलेली भाजपा ची 'गंगा' सध्या महाराष्ट्रात सुसाट वाहते आहे. या पवित्र गंगेचे महात्म्य एवढे आहे, की एकेकाळी भाजपा वर तोंडसुख घेणारे, त्यांच्यावर टीका करणारे नेते सध्या भाजपा मध्ये स्नान करत पवित्र होत आहे. आजचा 'महायुतीचा' प्रमुख मंत्र म्हणजे 'कुठं कुठं नाय नाय, भाजपमध्ये जायचं हाय' असा झाला आहे. पुण्य सलग्न असलेल्या नाशिकमध्ये गेल्या काही वर्षांपासून भाजपा गंगेच्या महात्म्याचा जास्तीत जास्त प्रसार झाला आहे. नाशिक महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येथे नित्यनवीन चेहरे भाजपा गंगेच्या पवित्र प्रवाहात डुंबत आहे. नाशिकमध्ये होणाऱ्या आगामी महापालिका निवडणुकीत भाजपने २०१७ मधील पराभवाचा वचपा काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरु केले आहेत. भाजपा ने नुकतीच मेळावा घेऊन निवडणूक तयारीला सुरुवात केली आहे. यासाठी नाशिकमध्ये 'पापविमोचन यात्रा' सुरू असल्याचे चित्र आहे.

### पाप्यांचा उद्धार, हेच ब्रीद..

कुण्या कुण्या पाप्याचा उद्धार करायचा, हे आधी निश्चित करणारी भाजपाकडे एक टोळी आहे. त्यानंतर त्या पाप्यावर हल्ला चढविला जातो. तो किती पापी आहे, भ्रष्टाचारी आहे, देशद्रोही आहे, हे सकाळ-दुपार-संध्याकाळ तारस्वरात ओरडून सांगितले जाते. शेवटी या प्रचंड दडपणामुळे त्या पाप्याचे हृदय परिवर्तन होते आणि तो भाजपाच्या गंगे स्नान करण्यास तयार होतो. एकदा का त्याने भाजपा गंगेत स्नान केले, की तो पवित्र झाला असे घोषित केले जाते, ही प्रक्रिया अव्याहतपणे सुरू आहे.

### 'पापविमोचन' यात्रेचे यश..

गेल्या काही दिवसांपासून ही पापविमोचन यात्रा जोरात सुरू आहे. महाराष्ट्र तर या गंगेचे सध्या प्रमुख चौपाटी ठरले आहे. नाशिकमध्ये खासदार हेमंत गोडसे यांच्यासोबतच आमदार, माजी महापौर, नगरसेवक, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, पक्षाचे माजी पदाधिकारी यांच्यावर भाजपा नेते सध्या डोळा ठेवून आहेत. त्यामुळे ७३ सदस्यांचे लक्ष्य गाठण्यासाठी भाजपा ने मेळावे आणि बैठका घेण्यास सुरुवात केली आहे. तसेच हेमंत गोडसे यांच्यावर कोणतेही भ्रष्टाचाराचे आरोप नाहीत, त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केलाय, राष्ट्रहितासाठी घेतलेल्या निर्णयामुळे त्यांनी झेललेले धोके हे निश्चितच भूषणावह आहेत, नारायण राणे असतील की अजित पवार, एकदा का त्यांनी भाजपा मध्ये प्रवेश केला, की मग सगळे विसरायचे आणि तोच पवित्र झाला म्हणायचे.

### एकनाथ शिंदे, अजितदादांचे उदाहरण

महाविकास आघाडी फोडून शिंदे सेना, अजितदादांची राष्ट्रवादी अशा पद्धतीने भाजपा च्या वळचणीला आली. निवडणूक काळात हा प्रवाह सतत धावमग्न असतो. नाशिकमधील प्रचंड भ्रष्टाचारी बडगुजर भाजपामध्ये आले आणि पवित्र झाले. त्यांच्यासोबत माजी मंत्री बबनराव गोळे, माजी सभापती अभिजीत आपटे पवित्र स्नानाला उपस्थित होतेच. सगळ्यांनीच पवित्र स्नान केले. आजच्या घडीला महाराष्ट्रामध्ये कोण कोण भाजपा मध्ये प्रवेश करणार? कोणाची पापे धुतली जाणार? कोण कोणाला उचलणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. हे सगळे पाहता निवडणूक जवळ आली, की भाजपा मध्ये प्रवेश करणे, त्यांची पापे धुणे, हे निवडणूक जिंकण्यासाठी केलेल्या पापविमोचनाच्या यात्रेसारखेच आहे, हे मात्र नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दूध भेसळ रोखण्यासाठी लवकरच नवा कायदा!

## सहकारी दुग्ध व्यवसायाची गळचेपी झाल्याची वस्तुस्थिती

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यातील दुग्ध व्यवसायात भेसळीचे प्रमाण वाढत असल्याच्या तक्रारी दिवसेंदिवस येत आहे. भेसळ रोखण्यासाठी लवकरच नवा कायदा अस्तित्वात येईल, अशी माहिती दुग्धविकासमंत्री अतुल सावे यांनी दिली. राज्यात दुधाला समान दर, एक राज्य एक ब्रँड, एक जिल्हा एक दूध संघ तसेच एक गाव एक दूध संस्था स्थापन करण्याबाबतची मागणी देखील काही दूध उत्पादकांकडून होत आहे. त्यावर शासन पातळीवर अभ्यास समिती नियुक्त करून सर्वानुमते निर्णय घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.**



कोपरगाव येथील गोदावरी खोरे तालुका सहकारी दूध उत्पादक संघाचे संस्थापक दिवंगत नेते नामदेवराव परजणे यांच्या २१ व्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त आज रविवारी दूध संघाच्या कार्यस्थळावर आयोजित करण्यात आलेल्या गौरवपत्र वितरण सोहळ्यात सावे बोलत होते. संघाचे अध्यक्ष राजेश परजणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे, कैलास तांबे, माजी नगराध्यक्ष विजय वहाडणे, नाशिक दुग्ध विभागाचे विभागीय सह. निबंधक सी. एम. बारी, जिल्हा दुग्ध विभागाचे सहायक अभियंता टी. बी. भोजणे, जिल्हा पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. उमेश पाटील, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. दशरथ दिघे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, दूध उत्पादक, संघाचे संचालक, कर्मचारी उपस्थित होते. दुग्ध व्यवसायाने शेतकऱ्यांच्या जीवनात स्थिरता आणली आहे. या व्यवसायाला जे संरक्षण हवे आहे ते अजून मिळत नसल्याच्या व्यावसायिकांच्या तक्रारी आहेत आणि त्या रास्तही आहेत. सहकारी आणि खासगी अशी स्पर्धा निर्माण झाल्याने सहकारी दुग्ध व्यवसायाची गळचेपी झाल्याची वस्तुस्थिती आहे, अशी कबुली सावे यांनी दिली. शासन स्तरावर राज्यातील सर्व सहकारी दूध संघ व संस्थांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करून अडचणी समजून घेऊन सर्वंकश तोडगा काढण्यात येणार असल्याचे सावे यांनी सांगितले. मंत्री विखे यांच्या कल्पकतेतून सुरू झालेली दूध उत्पादकांना दुधावर अनुदान देण्याची योजना तर अतिशय लक्षवेधी ठरली. त्यात तांत्रिक अडचणी आल्या.

अनेक दूध उत्पादकांना अनुदान मिळाले नसल्याच्या तक्रारी आमच्याकडे आल्यात पण त्यावरही लवकरच तोडगा काढून दूध उत्पादकांना न्याय मिळवून देणार असल्याचे त्यांनी सांगितले.संघाला सर्वाधिक दूध पुरवठा करणाऱ्या, स्वच्छ व उत्तम गुणप्रतीचा दूध पुरवठा करणाऱ्या, सर्वाधिक दर देणाऱ्या दूध संस्थांच्या प्रतिनिधींचा तसेच कृत्रिम गर्भधारणेचे उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या कृत्रिमरेतन तज्ज्ञांचा यावेळी गौरवपत्र देऊन सन्मान करण्यात आला. अपघातामध्ये मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना विमा रकमेच्या धनादेशाचे वितरणही यावेळी करण्यात आले. प्रास्ताविकात दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे यांनी दूथ व्यवसायातील अडचणींबाबत अनेक विषय यावेळी मांडले. यावेळी डॉ. सुजय विखे यांचे भाषण झाले.शेती उत्पन्नात वाढ, शेतीतील पिकांची शाश्वती, शेतमालाला हमी भाव व योग्य बाजारपेठ मिळवून देण्यासाठी व शेतकऱ्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी सर्वांनाच सोबत घेऊन शासन स्तरावर योग्य धोरण तयार करण्यात येईल. कृषी क्षेत्राशी संबंधित सर्व प्रकारच्या सेवा शेतकऱ्यांना एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यासाठी लवकरच एक ॲप विकसित करण्यात येणार आहे.

### पीक नुकसानीचे पंचनामे

शेतकऱ्यांची होणारी फसवणूक टाळण्याबरोबरच वेळेतही बचत होणार आहे. पीक नुकसानीचे आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पंचनामे करून पीक विम्याच्या अनुषंगाने अडचणी दूर करण्यात येतील.कोपरगाव येथील गोदावरी खोरे तालुका सहकारी दूध उत्पादक संघाचे संस्थापक दिवंगत नेते नामदेवराव परजणे यांच्या २१ व्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त आज रविवारी दूध संघाच्या कार्यस्थळावर आयोजित करण्यात आलेल्या गौरवपत्र वितरण सोहळ्यात सावे बोलत होते. संघाचे अध्यक्ष राजेश परजणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.दुग्ध व्यवसायाने शेतकऱ्यांच्या जीवनात स्थिरता आणली आहे. या व्यवसायाला जे संरक्षण हवे आहे ते अजून मिळत नसल्याच्या व्यावसायिकांच्या तक्रारी आहेत आणि त्या रास्तही आहेत.

# शेतकऱ्यांनी कर्ज भरलीच पाहिजे!

## कर्जमाफीचा निर्णय मुख्यमंत्र्यांचा : कृषिमंत्री कोकाटे

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु शेतकऱ्यांनी कर्ज भरलीच पाहिजे. मात्र कर्जमाफी संदर्भातील निर्णय मुख्यमंत्री घेतील, कर्जमाफीचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे. त्यांचा विचार लवकर कार्यान्वित होईल, अशी माहिती कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज रविवारी कोपरगाव येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.**



राज्यात मोठ्या प्रमाणात बोगस बियाणे, औषधे यांची विक्री होत आहे. या प्रश्नावर कोकाटे म्हणाले, ज्या कृषिसेवा केंद्राच्या बाबतीत तक्रार दाखल होईल त्यावर तत्काळ कारवाई केली जाईल. माझ्याकडे तक्रार आली तर मी लगेच कारवाई करणार आहे. राज्य सरकारने शेतीत भांडवली गुंतवणूक करावी ही माझी धारणा आहे.सरकार पाच वर्षांत २५ हजार कोटी रुपये भांडवली गुंतवणुकीसाठी खर्च करणार आहे. परदेशी धर्तीवर भारतातल्या शेतकऱ्यांना देखील न्याय मिळाला पाहिजे. सरकारी गुंतवणुकीमुळे शेतकऱ्यांचा फायदा होईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.नाशिकच्या पालकमंत्रिपदाबाबत मंत्री छगन भुजबळांचा दावा प्रबळ होत असल्याच्या प्रश्नावर कोकाटे यांना विचारले असता ते म्हणाले, नाशिकच्या बाबतीत फार विवाद नाहीत. पालकमंत्रिपदावर कुणाचाही दावा नाही. मुख्यमंत्री निर्णय घेतील आणि तो सर्वांना मान्य असेल. अजित पवार मुख्यमंत्री होतील का, याविषयी कोकाटे म्हणाले, इच्छा असण्यात वाईट काय? मुख्यमंत्रिपद हा आकड्यांचा खेळ आहे. आकड्यांच्या खेळात जो तो पक्ष काम करतो. आम्हालाही वाटतं दादांनी मुख्यमंत्री व्हावे त्यात चुकीचं काय आहे?राज-उद्धव ठाकरे युतीबाबत मी काही सांगू शकत नाही. काय निर्णय होईल हे त्या दोघांनाच माहिती असल्याचे कोकाटे यांनी सांगितले. महानंदा दूध संघाबाबत विचारले असता कोकाटे यांनी सांगितले, महानंदा पूर्वपदावर आली आहे. एनडीडीबीने ताब्यात घेतल्याने संस्था नफ्यात आली.

### तत्काळ कारवाई केली जाईल

टीका करणे विरोधकांचे काम असते. त्यांनी टीका केली नाही तर लोक त्यांना असे विचारणार असे स्पष्ट केले.राज्यात मोठ्या प्रमाणात बोगस बियाणे, औषधे यांची विक्री होत आहे. या प्रश्नावर कोकाटे म्हणाले, ज्या कृषिसेवा केंद्राच्या बाबतीत तक्रार दाखल होईल त्यावर तत्काळ कारवाई केली जाईल. माझ्याकडे तक्रार आली तर मी लगेच कारवाई करणार आहे. राज्य सरकारने शेतीत भांडवली गुंतवणूक करावी ही माझी धारणा आहे.सरकार पाच वर्षांत २५ हजार कोटी रुपये भांडवली गुंतवणुकीसाठी खर्च करणार आहे. परदेशी धर्तीवर भारतातल्या शेतकऱ्यांना देखील न्याय मिळाला पाहिजे. सरकारी गुंतवणुकीमुळे शेतकऱ्यांचा फायदा होईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.नाशिकच्या पालकमंत्रिपदाबाबत मंत्री छगन भुजबळांचा दावा प्रबळ होत असल्याच्या प्रश्नावर कोकाटे यांना विचारले असता ते म्हणाले.

# इंधन पुरवठ्यावर गंभीर परिणामांची भीती!

## अमेरिकेच्या हल्ल्यांनंतर इराणी कायदेमंडळाचा निर्णय

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**इस्रायल-इराण संघर्षात उडी घेत अमेरिकेने रविवारी पहाटेच्या वेळी इराणमधील तीन अणुकेंद्रांवर हवाई हल्ले चढविले. त्यानंतर काही तासांतच कच्चे तेल आणि वायूच्या व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा जलमार्ग असलेल्या 'होर्मुझ खाडी'ची नाकेबंदी करण्याच्या निर्णयाला इराणच्या कायदेमंडळाने मान्यता दिल्याचे समजते. याबाबतचा अंतिम निर्णय राष्ट्रीय सर्वोच्च सुरक्षा समितीवर सोडण्यात आला असला, तरी हा मार्ग बंद झाल्यास त्याचा मोठा फटका भारतासह जगभरातील इंधन पुरवठ्यावर होणार आहे.**



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'व्हाइट हाउस'मध्ये पत्रकारांना संबोधित करताना इराणवर हल्ले केल्याचे जाहीर केले. फोर्डो, इस्फाहान आणि नतान्झ या तीन ठिकाणी असलेली इराणची अणुकेंद्रे संपूर्णत: नष्ट केल्याचा दावा त्यांनी केला. त्यानंतर इराणने इस्रायलवर जोरदार क्षेपणास्त्र मारा करतानाच 'होर्मुझ खाडी'चा जलमार्ग व्यापारासाठी बंद करण्याचा इशारा दिला.या निर्णयाला कायदेमंडळाने तातडीने मंजुरी दिल्याचे सांगितले जात असून आता सुरक्षा समितीच्या निर्णयाची प्रतीक्षा आहे. कायदेमंडळाचा निर्णयही अद्याप अधिकृतरीत्या जाहीर झालेला नाही. या खाडीतून जगातील २० टक्के इंधनाचा व्यापार चालतो. पश्चिम आशियातून भारतात येणारे बहुतांश कच्चे तेल याच मार्गाने आणले जाते. त्यामुळे हा मार्ग बंद झाल्यास त्याचा देशातील इंधन पुरवठ्याला मोठा फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे. दरम्यान, फोर्डो, इस्फाहान आणि नतान्झ या अणुकेंद्रांवर हल्ला झाल्याचे इराणच्या अणुऊर्जा संस्थेने मान्य करतानाच यामुळे आपला अणू कार्यक्रम थांबणार नसल्याचे म्हटले आहे. तसेच या तिन्ही ठिकाणी किरणोत्सर्गाचे पुरावे अद्याप मिळाले नसल्याचे इराण तसेच संयुक्त राष्ट्रांच्या अणुऊर्जा संस्थांनी स्पष्ट केले. दुसरीकडे अमेरिकेने प्रत्यक्ष युद्धात उडी घेतल्यानंतर इराणकडून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त झाली. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी या हल्ल्यांचा निषेध करताना भविष्यात घडणाऱ्या घटनांना संपूर्णत: अमेरिका जबाबदार असेल, असे म्हटले आहे. ते लवकरच मॉस्को येथे जाऊन रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांचीही भेट घेणार आहेत. दुसरीकडे, इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी ट्रम्प यांच्यावर स्तुतिसुमने उधळत अमेरिकेने केलेल्या हल्ल्याचे स्वागत केले.राण आणि इस्रायल-अमेरिका टोकाची भाषा करत असताना युद्धाचा आणखी भडका उडण्याची भीती व्यक्त होत आहे. जगभरातील नेत्यांनी तिन्ही देशांना चर्चेतून मार्ग काढण्याचे आवाहन केले असले, तरी सद्य:स्थितीत तशी शक्यता कमी असल्याचे मानले जात आहे. आम्ही इराणमधील तीन अणुकेंद्रांवर अतिशय यशस्वी हल्ले केले आहेत. मुख्यत: फोर्डोच्या केंद्रावर विमानातील सर्व बॉम्ब टाकण्यात आले. हा अमेरिकेसाठी ऐतिहासिक क्षण आहे. इराणने आता युद्ध संपविण्यासाठी तातडीने तयार व्हावे.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'व्हाइट हाउस'मध्ये पत्रकारांना संबोधित करताना इराणवर हल्ले केल्याचे जाहीर केले. फोर्डो, इस्फाहान आणि नतान्झ या तीन ठिकाणी असलेली इराणची अणुकेंद्रे संपूर्णत: त्यानंतर इराणने इस्रायलवर जोरदार क्षेपणास्त्र मारा करतानाच 'होर्मुझ खाडी'चा जलमार्ग व्यापारासाठी बंद करण्याचा इशारा दिला.या निर्णयाला कायदेमंडळाने तातडीने मंजुरी दिल्याचे सांगितले जात असून आता सुरक्षा समितीच्या निर्णयाची प्रतीक्षा आहे.

### इंधन पुरवठ्याला मोठा फटका

कायदेमंडळाचा निर्णयही अद्याप अधिकृतरीत्या जाहीर झालेला नाही. या खाडीतून जगातील २० टक्के इंधनाचा व्यापार चालतो. पश्चिम आशियातून भारतात येणारे बहुतांश कच्चे तेल याच मार्गाने आणले जाते. त्यामुळे हा मार्ग बंद झाल्यास त्याचा देशातील इंधन पुरवठ्याला मोठा फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे. दरम्यान, फोर्डो, इस्फाहान आणि नतान्झ या अणुकेंद्रांवर हल्ला झाल्याचे इराणच्या अणुऊर्जा संस्थेने मान्य करतानाच यामुळे आपला अणू कार्यक्रम थांबणार नसल्याचे म्हटले आहे. तसेच या तिन्ही ठिकाणी किरणोत्सर्गाचे पुरावे अद्याप मिळाले नसल्याचे इराण तसेच संयुक्त राष्ट्रांच्या अणुऊर्जा संस्थांनी स्पष्ट केले.

# एअर इंडियाचा घेतला मोठा निर्णय

## एअर इंडियाच्या 19 मार्गांवरील विशेष विमानांची सेवा केली कमी

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**अहमदाबादमध्ये १२ जून रोजी एअर इंडियाच्या विमानाला झालेल्या अपघाताच्या घटनेनंतर एअर इंडिया सावध पावलं टाकत आहे. कारण अहमदाबादमध्ये एका विमानाला झालेल्या अपघाताच्या घटनेनंतर आणखी १७ जून रोजी काही विमानांची उड्डाणे तांत्रिक कारणास्तव रद्द केले होते. त्यानंतर एअर इंडियाने आंतरराष्ट्रीय उड्डाणे १५ टक्के कमी करण्याचा निर्णय घेतला होता. या मागची वेगवेगळी कारणे सांगितली होती.**




यानंतर आता एअर इंडियाने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे.एअर इंडियाने १९ मार्गांवरील विशेष विमानांची सेवा कमी करण्याची घोषणा केली आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. १९ मार्गांवरील नॅरोबॉडी फ्लाइट्स तात्पुरत्या स्वरूपात कमी केल्याची माहिती एअर इंडियाने एक्सवर (ट्विटर) दिली आहे. तसेच नेमकी कोणत्या १९ मार्गांवरील नॅरोबॉडी फ्लाइट्सची सेवा कमी केली? याची माहिती देखील दिली आहे. एका औपचारिक निवेदनात एअरलाइनने म्हटलं की, "ते त्यांच्या एकूण नॅरो-बॉडी फ्लाइट्स नेटवर्कमध्ये ५ टक्क्यांपेक्षा कमी तात्पुरती कपात करत आहेत. या निर्णयामुळे ३ मार्गांवरील एअर इंडियाच्या सेवा तात्पुरत्या स्थगित करण्यात आल्या आहेत आणि १९ मार्गांवरील विमानांची संख्या कमी करण्यात आली आहे. हे बदल किमान १५ जुलै २०२५ पर्यंत असतील", असं म्हटलं आहे.

### खालील विमानांची सेवा कमी

बेंगळुरू-चंदीगड : आठवड्याच्या १४ वेळावरून आता ७ वेळा
-दिल्ली-बेंगळुरू : आठवड्याच्या ११६ वेळावरून आता ११३ वेळा
-दिल्ली-मुंबई : आठवड्याच्या १७६ वेळावरून आता १६५ वेळा
-दिल्ली-कोलकाता : आठवड्याच्या ७० वेळावरून आता ६३ वेळा
-दिल्ली-कोइम्बतूर : आठवड्याच्या १३ वेळावरून आता १२ वेळा
-दिल्ली-गोवा (दाबोलिम) : आठवड्याच्या १४ वेळावरून आता ७ वेळा
-दिल्ली-गोवा (मोपा) : आठवड्याच्या १४ वेळावरून आता ७ वेळा
-दिल्ली-हैदराबाद : आठवड्याच्या ८४ वेळावरून आता ७६ वेळा
-दिल्ली-इंदूर : आठवड्याच्या २१ वेळावरून आता १४ वेळा
-दिल्ली-लखनऊ : आठवड्याच्या २८ वेळावरून आता २१ वेळा
-दिल्ली-पुणे : आठवड्याच्या ५९ वेळावरून आता ५४ वेळा
-मुंबई-अहमदाबाद : आठवड्याच्या ४१ वेळावरून आता ३७ वेळा
-मुंबई-बेंगळुरू : आठवड्याच्या ९१ वेळावरून आता ८४ वेळा
-मुंबई-कोलकाता : आठवड्याच्या ४२ वेळावरून आता ३० वेळा
-मुंबई-कोइम्बतूर : आठवड्याच्या २१ वेळावरून आता १६ वेळा
-मुंबई-कोची : आठवड्याच्या ४० वेळावरून आता ३४ वेळा
-मुंबई-गोवा (दाबोली) : आठवड्याच्या ३४ वेळावरून आता २९ वेळा
-मुंबई-हैदराबाद : आठवड्याच्या ६३ वेळावरून आता ५१ वेळा
-मुंबई-वाराणसी : आठवड्याच्या १२ वेळावरून आता ७ वेळा

# माधुरी दीक्षितने भाड्याने दिलं अंधेरीतील ऑफिस!

माधुरी दीक्षित गेल्या काही दिवसांपासून 'भुल भुलैया ३' चित्रपटामुळे चर्चेत होती. या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर सुद्धा चांगलं यश मिळालं. याशिवाय माधुरी आणि विद्याच्या नृत्याच्या जुगलबंदीचं सर्वत्र कौतुक करण्यात आलं. पण, सध्या बॉलीवूडची ही धकधक गर्ल एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. ती गोष्ट म्हणजे तिचं मुंबईच्या अंधेरी परिसरातलं ऑफिस. हे ऑफिस अभिनेत्रीने नुकतंच भाड्याने दिलं आहे. बॉलीवूड सेलिब्रिटी सिनेमांव्यतिरिक्त रिअल इस्टेट मार्केटमधून देखील पैसे कमावताना दिसतात. माधुरीचं ( MADHURI DIXIT ) आलिशान ऑफिस मुंबईतील अंधेरी पश्चिम परिसरात आहे. या जागेचं एकूण क्षेत्रफळ १५९४.२४ स्क्वेअर फूट आहे. माधुरीने हे ऑफिस नुकतंच एका खाजगी कंपनीला भाड्याने दिलं आहे. प्रॉपस्टॅकने



सादर केलेल्या कागदपत्रांचा हवाला देत हिंदुस्तान टाइम्सने दिलेल्या वृत्तानुसार, माधुरीला या ऑफिसचं भाडं दरमहा तब्बल ३ लाख रुपये मिळणार आहे. यासाठी भाडेकरू कंपनीने ९ लाखांचं डिपॉझिट जमा केलं आहे. पहिल्या वर्षासाठी मासिक ( प्रतिमहिना ) भाडं ३ लाख रुपये, तर दुसऱ्या वर्षी हेच भाडं प्रतिमहिना ३.१५ लाख रुपये असेल. माधुरीप्रमाणे याआधी म्हणजेच नोव्हेंबर महिन्यात शाहिद आणि मीरा कपूर यांनीही त्यांचं मुंबईतलं ( वरळी परिसर ) घर भाड्याने दिलं होतं.माधुरी दीक्षितने काही दिवसांपूर्वीच मुंबईच्या लोअर परेल भागात एक आलिशान फ्लॅट देखील खरेदी केला आहे. या घराचं क्षेत्रफळ ५,३८४ चौरस फूट इतकं आहे. याबरोबर सात पार्किंग जागांची सुविधा देखील देण्यात आली आहे. हा भव्य फ्लॅट माधुरीने ४८ कोटींना विकत घेतला होता. तर, नव्या घराचा व्यवहार करताना अभिनेत्रीने २.४ कोटींची स्टॅम्प ड्युटी भरली होती.

## डाव्यांची लायकी काय आहे

बॉलीवूड अभिनेते व लेखक पीयूष मिश्रा यांनी नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'जेएनयू' (जहांगीर नॅशनल युनिव्हर्सिटी) सिनेमात काम केल्याबद्दल बिनशर्त माफी मागितली आहे. 'जेएनयू' हा एक वादग्रस्त चित्रपट होता, हा प्रोपगंडा सिनेमा असल्याची टीकाही समीक्षकांनी केली होती. कम्युनिस्ट लोकांबद्दल द्वेष असल्यामुळे संपूर्ण स्क्रिप्ट न वाचता ही भूमिका स्वीकारण्याचं मिश्रा यांनी सांगितलं. हा चित्रपट करणे ही चूक होती, असंही त्यांनी म्हटलं आहे.'दैनिक जागरण'ला दिलेल्या मुलाखतीत पीयूष मिश्रा यांना त्यांच्या कम्युनिस्ट भूतकाळाबद्दल विचारण्यात आलं. "त्यावेळी मला त्यापेक्षा चांगलं काही माहीत नव्हतं. मी तेव्हाही कम्युनिस्ट विचारसरणीचं समर्थन करत नव्हतो, पण त्याकाळी माझ्याकडे स्वतःचे कोणतेही व्यक्तिमत्व नव्हते, त्यामुळे आजूबाजूच्या लोकांचे अनुसरण करण्याशिवाय पर्याय नव्हता," असं ते म्हणाले.

## माहिराने तिच्या संघर्षावर प्रकाश टाकला



पाकिस्तानी अभिनेत्री माहिरा खानने शाहरुख खानबरोबर 'रईस' या सिनेमात काम केले होते. त्यानंतर पाकिस्तानी कलाकारांवर भारतीय चित्रपटांमध्ये काम करण्यावर बंदी घालण्यात आली. अभिनेत्रीने अलीकडेच या विषयासह तिच्या खासगी आयुष्य यांवर भाष्य केले आहे. माहिराने याच मुलाखतीत बॉलीवूड अभिनेता रणबीर कपूरबरोबर तिचे सिगारेट ओढतानाचे फोटो व्हायरल झाल्यानंतरच्या परिस्थितीवर वक्तव्य केले आहे. 'बीबीसी एशियन नेटवर्क'शी संवाद साधताना माहिराने तिच्या आयुष्यातील संघर्षावर प्रकाश टाकला. ती म्हणाली, "घटस्फोट होणे, मूल असणे, इतके दिवस सिंगल राहणे, तसेच ते फोटो व्हायरल होणे आणि यासह दुसऱ्या देशात कामावर बंदी असणे... या सर्व गोष्टी माझ्या आयुष्यात झाल्या. हा खूप कठीण काळ होता."माहिराने सांगितले की, जेव्हा तिचे रणबीर कपूरबरोबरचे फोटो व्हायरल झाले, तेव्हा तिला वाटले की, तिचे करिअर संपले आहे. ती म्हणाली, "माझे आणि रणवीरचे न्यू यॉर्कमधील फोटो व्हायरल झाल्यानंतर एका वृत्तपत्रानं 'द लिटील व्हाइट ड्रेस' नावाचा लेख प्रकाशित केला होता. त्या लेखात लिहिलं होतं की, पाकिस्तानातील मोठं यश मिळवणारी ती एकमेव महिला आहे, तिला प्रसिद्धी मिळाली, ती खूप लोकप्रिय झाली; पण आता हे सगळं संपलं आहे. तिचं पुढे काय होणार? मी तो लेख वाचला आणि मी विचार केला, अरे देवा! आता माझं करिअर संपणार का? पण नंतर मी स्वतःला समजावलं, तुला काय झालं आहे? हा वाईट काळ अन् लवकरच हे सर्व संपेल."माहिरा पुढे म्हणाली, "तो काळ खूप कठीण होता. मी बेडमधून उठत नव्हते. मी रोज रडत होते. याचा माझ्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यावर मोठा परिणाम झाला. माझ्या वैयक्तिक आयुष्यात खूप काही घडलं.पाकिस्तानी अभिनेत्री माहिरा खानने शाहरुख खानबरोबर 'रईस' या सिनेमात काम केले होते. त्यानंतर पाकिस्तानी कलाकारांवर भारतीय चित्रपटांमध्ये काम करण्यावर बंदी घालण्यात आली. अभिनेत्रीने अलीकडेच या विषयासह तिच्या खासगी आयुष्य यांवर भाष्य केले आहे.

## गोविंदाचा 'तो' व्हिडीओ होतोय व्हायरल

शनिवारी बॉलीवूड स्टार गोविंदाने त्याच्या नवीन लूकमधील एक फोटो शेअर करून सर्वांना आश्चर्यचकित केले. फोटोमध्ये गोविंदा पातळ मिशा आणि मोठ्या चष्म्यासह दिसत होता. हा फोटो पाहून चाहते अंदाज लावत होते की, हा अभिनेता एका नवीन चित्रपटात दिसणार आहे. आता हा अभिनेता काही चुकीच्या कारणांमुळे चर्चेत आहे.रेडिटवर त्याचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो फ्लाइटमध्ये एका लहान मुलीच्या खांद्यावर डोके ठेवून बसलेला दिसत आहे. चाहत्यांना त्याची ही शैली अजिबात आवडली नाही आणि त्यांनी त्याच्यावर टीका करायला सुरुवात केली.व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये, ६१ वर्षीय अभिनेता सेल्फी व्हिडीओ रेकॉर्ड करताना आणि त्याच्या शेजारी बसलेल्या मुलीच्या खांद्यावर टेकताना दिसत आहे. असे वाटत होते की, मुलीला काहीही समजत नव्हते आणि नेटिझन्सना असे वाटले की, तिलादेखील अस्वस्थ वाटत आहे. त्याच वेळी गोविंदा कॅमेऱ्याकडे पाहून हसत होता. आता चाहते त्यावर "तो काय करत आहे? ती छोटी मुलगी कोण आहे?", "डरावना नंबर १", "अरे देवा, हे किती भयानक आहे! उफ्फ", "तू मर्यादा ओलांडली आहेस" अशा विविध कमेंट्स करीत आहेत. दुसऱ्या एका चाहत्याने कमेंट केली की, याची बायको बरोबर बोलते". ती मुलगी गोविंदाच्या टीमचा भाग होती की त्याच्या ओळखीची कोणी होती हे स्पष्ट झालेले नाही, की ती सहप्रवासी होती.शुक्रवारी (२० जून) गोविंदा त्याच्या नवीन लूकमध्ये दिसला आणि त्याचे चाहते आश्चर्यचकित झाले. काहींना वाटले की, कदाचित हा त्याचा नवीन प्रोजेक्टसाठीचा लूक असेल.

## तुझ्याकडून हे अपेक्षित नव्हते : रितेश देशमुख

अभिनेता रितेश देशमुख नुकताच 'हाऊसफुल ५' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या चित्रपटातील त्याच्या भूमिकेला प्रेक्षकांकडून प्रेम मिळत आहे. ६ जूनला प्रदर्शित झालेल्या चित्रपटाची अजूनही बॉक्स ऑफिसवर यशस्वी घोडदौड सुरू आहे. २० जूनला रितेशची पत्नी व लोकप्रिय अभिनेत्री जिनिलीया देशमुख व आमिर खान यांच्या प्रमुख भूमिका असलेला सितारे जमीन पर हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे पाहायला मिळत आहे. चित्रपटांशिवाय रितेश व जिनिलीया हे लोकप्रिय सेलेब्रिटी जोडपे आहे. त्यांना अनेक जण दादा-वहिनी म्हणून ओळखतात. या जोडप्याचे नेहमीच कौतुक होताना दिसते. आता मात्र एका व्हिडीओमुळे रितेश देशमुख चर्चेत आला आहे.सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल होताना दिसत आहे. बॉलीवूड हेल्पलाईन या इन्स्टाग्राम अकाउंटवरून हा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. 'सितारे जमीन पर' चित्रपटाच्या प्रीमियरला जिनिलीयासह रितेश देशमुखने हजेरी लावली होती. त्यावेळी गर्दीतून रितेश जिनिलीयाला घेऊन स्क्रीनिंगच्या ठिकाणी घेऊन जात होता. त्यावेळी एक मुलगा त्याच्याकडे सेल्फी काढण्यासाठी आला. त्याने फोटोसाठी विचारले; पण रितेशने त्याला फोटो काढू दिला नाही. सुरक्षा रक्षकाने त्या मुलाला बाजूला सारले. त्यावेळी त्या मुलाला वाईट वाटल्याचे दिसत आहे.हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर त्यावर अनेक कमेंट्स आल्याचे पाहायला मिळत आहे. अनेक नेटकऱ्यांनी रितेशचे हे वागणे आवडले नसल्याचे म्हटले आहे; तर काहींनी राग व्यक्त केला आहे. एका नेटकऱ्याने लिहिले, "पहिल्यांदा मला रितेशचा ॲटिट्यूड आवडला नाही". दुसऱ्या एका नेटकऱ्याने लिहिले, "तुझ्याकडून हे अपेक्षित नव्हते. हे खूप चुकीचे वागणे आहे".एका नेटकऱ्याने रितेशला टॅग करीत लिहिले, "कल्पना कर की, त्याच्या पालकांनी त्याला तुझ्याकडे पाठवले असेल. तो शांतपणे तुझ्याकडे आला आणि सेल्फी काढण्याचा प्रयत्न करीत होता. त्यात चुकीचे काय आहे. प्रेमाने वाग".

# क्रिकेटप्रेमींसाठी धक्कादायक गोष्ट!

## अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी नावावरून पेटला नवा वाद

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत वि. इंग्लंड कसोटी मालिकेला नवीन नावं देण्यात आलं आहे. ही मालिका आता यापुढे अँडरसन तेंडुलकर ट्रॉफी या नावाने ओळखली जाणार आहे. इंग्लंडचा दिग्गज वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसन आणि भारताचा मास्टर ब्लास्टर खेळाडू सचिन तेंडुलकर यांच्या नावावरून या ट्रॉफीचं नाव ठेवण्यात आलं आहे. भारत-इंग्लंड मालिका सुरू होण्यापूर्वी या नव्या ट्रॉफीचं अनावरण करण्यात आलं. पण या ट्रॉफीच्या नावाबाबत सुनील गावस्कर यांनी प्रश्न उपस्थित केला आहे.**



### अँडरसनचं नाव पाहणं धक्कादायक

चिन तेंडुलकरचे योगदान आणि वरिष्ठता लक्षात घेता त्याचे नाव प्रथम आले पाहिजे असे सुनील गावस्कर यांचे मत आहे. गावस्कर यांनी मिड-डे मधील त्यांच्या स्तंभलेखात लिहिलं आहे की इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाला (ECB) त्यांच्या इच्छेनुसार ट्रॉफीचे नाव देण्याचा अधिकार असला तरी भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी तेंडुलकरच्या आधी जेम्स अँडरसनचे नाव पाहणं आश्चर्यकारक आहे. सुनील गावस्कर म्हणाले, “ईसीबीकडे (इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्ड) या मालिकेला कोणतंही नाव देण्याचा पूर्ण अधिकार आहे, परंतु बहुतेकांसाठी, अगदी सर्वांसाठी नाही तर, भारतीय क्रिकेटप्रेमींसाठी तेंडुलकरच्या आधी अँडरसनचं नाव पाहणं धक्कादायक गोष्ट आहे. सचिन तेंडुलकर कपिल देव यांच्यासह केवळ महान भारतीय क्रिकेटपटूच नाही तर अँडरसनपेक्षा १२ वर्षांनी मोठा आहे.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील सुरू असलेल्या कसोटी मालिकेसाठी नवीन ट्रॉफीच्या नावावर भारतीय क्रिकेट दिग्गज सुनील गावस्कर यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. गावस्कर यांनी नुकत्याच सुरू झालेल्या ‘अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी’चे नाव बदलून ‘तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफी’ करावी असं म्हटलं आहे. यामागचं कारणही त्यांनी सांगितलं आहे. अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी यापूर्वी पटौदी ट्रॉफी या नावाने ओळखली जात असे. चिन तेंडुलकरचे योगदान आणि वरिष्ठता लक्षात घेता त्याचे नाव प्रथम आले पाहिजे असे सुनील गावस्कर यांचे मत आहे. गावस्कर यांनी मिड-डे मधील त्यांच्या स्तंभलेखात लिहिलं आहे की इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाला (ECB) त्यांच्या इच्छेनुसार ट्रॉफीचे नाव देण्याचा अधिकार असला तरी भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी तेंडुलकरच्या आधी जेम्स अँडरसनचे नाव पाहणं आश्चर्यकारक आहे.सुनील गावस्कर म्हणाले,“ईसीबीकडे (इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्ड) या मालिकेला कोणतंही नाव देण्याचा पूर्ण अधिकार आहे, परंतु बहुतेकांसाठी, अगदी सर्वांसाठी नाही तर, भारतीय क्रिकेटप्रेमींसाठी तेंडुलकरच्या आधी अँडरसनचं नाव पाहणं धक्कादायक गोष्ट आहे. सचिन तेंडुलकर कपिल देव यांच्यासह केवळ महान भारतीय क्रिकेटपटूच नाही तर अँडरसनपेक्षा १२ वर्षांनी मोठा आहे. कसोटी क्रिकेटमध्ये धावा आणि शतकांच्या बाबतीत तो पहिल्या स्थानी आहे. तर परंतु एकदिवसीय क्रिकेटमध्येही सर्वांपेक्षा जास्त धावा त्याच्या नावावर आहेत.”गावस्कर यांनी मिड-डे मधील त्यांच्या स्तंभात पुढे लिहिलं, “कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत अँडरसन तिसऱ्या क्रमांकावर आहे आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्याचा रेकॉर्ड तेंडुलकरइतका चांगला नाहीये. तेंडुलकर हा विश्वचषक विजेत्या संघाचा देखील भाग आहे जो अँडरसन नव्हता. जिमी अँडरसन एक उत्तम गोलंदाज होता पण प्रामुख्याने इंग्लंडच्या परिस्थितीत आणि परदेशात त्याचा रेकॉर्ड तेंडुलकरइतका चांगला नाही. मी भारतीय माध्यमांसह सर्व भारतीय क्रिकेटप्रेमींनाही तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफी म्हणण्याचे आवाहन करतो.अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी ही ईसीबी आणि बीसीसीआय यांच्या संयुक्त उपक्रमातून आयोजित केली जाणारी स्पर्धा आहे. या नव्या नावापूर्वी इंग्लंडमधील मालिका ही पतौडी ट्रॉफीच्या नावाने ओळखली जात होती तर भारतातील मालिका अँथनी डी मेलो ट्रॉफी या नावाने खेळवली जात होती.भारत आणि इंग्लंड यांच्यातील सुरू असलेल्या कसोटी मालिकेसाठी नवीन ट्रॉफीच्या नावावर भारतीय क्रिकेट दिग्गज सुनील गावस्कर यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. गावस्कर यांनी नुकत्याच सुरू झालेल्या ‘अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी’चे नाव बदलून ‘तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफी’ करावी असं म्हटलं आहे. यामागचं कारणही त्यांनी सांगितलं आहे. अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी यापूर्वी पटौदी ट्रॉफी या नावाने ओळखली जात असे.

---

# यशस्वीच्या हातून सोपे झेल निसटले

## 5 विकेट्स घेतल्यानंतर जसप्रीत बुमराह नेमकं काय म्हणाला?

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत आणि इंग्लड या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय संघ आघाडीवर आहे. तिसऱ्या दिवसाचा खेळ पावसामुळे अर्धा तासाआधीच थांबवण्यात आला. भारतीय संघाने आतापर्यंत ९६ धावांची आघाडी घेतली आहे. भारतीय संघाने पहिल्या डावात ४७१ धावा केल्यानंतर इंग्लंडचा पहिला डाव ४६५ धावांवर आटोपला.**



### काय म्हणाला जसप्रीत बुमराह?

शुबमन गिल ६ धावांवर नाबाद आहे.भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना जसप्रीत बुमराहने सर्वाधिक ५ गडी बाद केले. दरम्यान सामन्यानंतर बोलताना त्याने झेल सोडण्याबाबत मोठं वक्तव्य केलं आहे जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीवर विकेट्स घेण्याच्या अनेक संधी निर्माण झाल्या होत्या.

भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना जसप्रीत बुमराहने सर्वाधिक ५ गडी बाद केले. दरम्यान सामन्यानंतर बोलताना त्याने झेल सोडण्याबाबत मोठं वक्तव्य केलं आहे.जसप्रीत बुमराह पहिल्या डावात सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. बुमराहने इंग्लंडच्या ५ फलंदाजांना पॅव्हेलियनची वाट दाखवली. यादरम्यान जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीवर विकेट्स घेण्याच्या अनेक संधी निर्माण झाल्या होत्या. मात्र,क्षेत्ररक्षकांनी केलेल्या चुकांमुळे इंग्लंडच्या फलंदाजांना जीवदान मिळालं. भारतीय संघाकडून यशस्वी जैस्वाल आणि रविंद्र जडेजा यांनी काही महत्वाचे झेल सोडले. झेल सोडल्यानंतर बुमराहने संतप्त प्रतिक्रिया दिली. पण त्यानंतर लगेच तो पुढील चेंडू टाकण्यासाठी सज्ज झाला. जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीवर सुटलेले झेल हे भारतीय संघाला चांगलेच महागात पडले. कारण ते झेल सुटले नसते, तर नक्कीच १०० ते १५० धावांचा फरक पडला असता. सामन्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना बुमराह म्हणाला,” झेल सुटला, याचा मी फार विचार करत बसत नाही. कोणीच मुद्दाम झेल सोडत नाही. हा खेळाचा एक भाग आहे. युवा खेळाडू आहेत अनुभवाने शिकतील.” भारतीय संघात बरेच खेळाडू आहेत जे पहिल्यांदाच इंग्लंडमध्ये खेळत आहेत. इंग्लंडमध्ये स्लिपमध्ये झेल पकडणं मुळीच सोपं नसतं. त्यामुळे कधी कधी झेल सुटतात. मात्र, बुमराहने कोणावरही टीका न करता युवा खेळाडूंच्या पाठीशी उभा राहिला आहे.या सामन्याबद्दल बोलायचं झालं, तर सामन्याच्या तिसऱ्या दिवशी इंग्लंडचा संपूर्ण डाव ४६५ धावांवर आटोपला. इंग्लंडकडून ओली पोपने सर्वाधिक १०६ धावांची खेळी केली. तर हॅरी ब्रुकचं शतक एका धावेने हुकलं. तो ९९ धावांवर माघारी परतला. बेन डकेटने या डावात ६२ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर इंग्लंडने ४६५ धावांपर्यंत मजल मारली. पण भारतीय संघापेक्षा ६ धावांनी मागे राहिला. भारतीय संघाकडून दुसऱ्या डावात फलंदाजीला आलेला यशस्वी जैस्वास स्वस्तात माघारी परतला. केएल राहुल ४७ धावांवर नाबाद आहे. तर साई सुदर्शनने ३० धावांची खेळी केली.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। सोमवार ।
। दि. 23 जून 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
Powered by
JAI HIND EDUTECH
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


Not just education, but
Personality
transformation.
ADMISSIONS OPEN for 2025-26
• CBSE curriculum
• Initiatives like ‘Read-to-Lead’
• Tradition of 100% result